सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

# मुंबईचा शेतकरी नसलेल्या व्यक्तींना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८

(दिनांक १ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला)

## Bombay Act No. III of 1928

# The Bombay Non-Agriculturists Loans Act, 1928

*(As modified upto 1st November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रुपये २.०० ]

# मुंबईचा शेतकरी नसलेल्या व्यक्तींना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८

## सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव .. .. .. .. | १ |
| २. | व्याप्ति .. .. .. .. | १ |
| ३. | कोणत्या कारणासाठी कर्जे देता येतील .. .. .. | १ |
| ४. | आधीच दिलेली कर्जे ह्या अधिनियमाअन्वये दिलेली आहेत असे समजणे .. | १ |
| ५. | कर्जाची वसुली .. .. .. .. | २ |
| ६. | नियम करण्याचा अधिकार .. .. .. .. | २ |
| ७. | [निरसन करण्यात आले] .. .. .. .. | २ |

# सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३[1]

## [मुंबईचा शेतकरी नसलेल्या व्यक्तींना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८][+]

[दिनांक ३० मार्च १९२८ ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :–

सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११.
भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.
सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

**सरकारने शेतकरी नसलेल्या व्यक्तींना [2][* * *] कर्जे देण्याची व अशा कर्जाच्या वसुलीची तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सरकारने शेतकरी नसलेल्या व्यक्तींना [2][* * *] कर्जे देण्याची व यात यापुढे दिलेल्या रीतीने अशा कर्जाच्या वसुलीची तरतूद करणे इष्ट आहे :

[3][* * * *]

**त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

१. या अधिनियमास, मुंबईचा शेतकरी नसलेल्या व्यक्तींना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव

२. [4][२. हा अधिनियम, संपूर्ण [5][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल. व्याप्ती

सन १८८४ चा १२.

३. कलम ६ अन्वये करण्यात येतील अशा नियमास अधीन राहून [6][शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४] याअन्वये ज्यास कर्जे देता येत नाही अशा कोणत्याही व्यक्तीस [7][घरे बांधण्यासाठी, ती पुन्हा बांधण्यासाठी किंवा घरे दुरुस्त करण्यासाठी किंवा नवे बांधण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी] किंवा संकटाचे निवारण करण्यासाठी या अधिनियमाअन्वये कर्जे देता येतील. कोणत्या कारणासाठी कर्जे देता येतील.

४. कलम ३ मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींना, त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या कारणासाठी दिनांक १ ऑगस्ट १९२७ नंतर दिलेली सर्व कर्जे या अधिनियमान्वये दिलेली कर्जे आहेत असे समजले पाहिजे. आधीच दिलेली कर्जे या अधिनियमाअन्वये दिलेली आहेत असे समजणे.

---

१. उद्देश व कारणे याचे निवेदन यासाठी मुंबई शासन राजपत्र, १९२८ भाग ५, पृ. ७; व परिषद प्रक्रियेसाठी मुंबई विधान परिषद विवाद, १९२८ याचे खंड २२ पहावे.
२. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३(१) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
४. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. केंद्रीय अधिनियम पहावा.
७. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
+ या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास तो यावरून लागू करण्यात येत आहे आणि तो अशा रीतीने लागू करण्यात आल्यामुळे त्या भागात अंमलात येईल.

कर्जाची वसुली.

५. [१] *** या अधिनियमाअन्वये, दिलेली किंवा दिलेली आहेत असे समजण्यात येणारी सर्व कर्जे,अशा कर्जावर जे कोणतेही व्याज आकारता येण्यासारखे असेल ते सर्व व्याज व अशी कर्जे देण्यात व वसूल करण्यात काही खर्च झाला असेल तर तो खर्च हा सर्व मिळून, कलेक्टरच्या स्वविवेकानुसार पुढील एका किंवा अनेक रीतीनी वसूल करता येतील. म्हणजे :—

(क) अर्जदाराकडून— त्याजकडून येणें असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे ;

(ख) त्यास जामीन राहिलेल्या व्यक्तीकडून (कोणी असल्यास)—त्याजकडून येणे असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे ;

(ग) मयत कर्जदाराने किंवा जमिनाने आपल्या मागे ठेवलेल्या मालमत्तेतून किंवा आनुषंगिक तारणादाखल दिलेल्या मालमत्तेतून (काही असल्यास),—ज्या जमिनीबद्दल महसूल येणे असेल त्या जमिनीव्यतिरिक्त कसूर करणाऱ्या व्यक्तीची इतर स्थावर किंवा जंगम मालमत्ता विकून जमीन महसूल वसूल करण्यासाठी विहित केलेल्या कार्यरितीप्रमाणे ;

(घ) जर कर्ज घराच्या फायद्यासाठी काढले असेल तर, अशा घराद्वारे,—असे घर ज्या जमिनीवर बांधलेले असेल त्या जमिनीच्या संबंधात येणे असलेली जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे.

[२]**[स्पष्टीकरण.— या कलमात, "कलेक्टर" या संज्ञेत "डेप्युटी कमिशनर" याचा समावेश होतो].**

नियम करण्याचा अधिकार.

[३]६. (१) या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी, [४][[५][राज्य] सरकारास], [६][राजपत्रात] अधिसूचना प्रसिध्द करून, वेळोवेळी नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषकरून आणि वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, असे नियम पुढील गोष्टींसाठी करता येतील :—

(क) कर्जे मिळण्यासाठी अर्ज करण्याची रीत ;

(ख) कर्जे देण्याचा ज्यास अधिकार आहे असे अधिकारी ;

(ग) पैशाचा योग्य विनियोग केला जाण्याबद्दल व त्याची फेड केली जाण्याबद्दल घ्यावयाचे तारण काही असल्यास त्याचे स्वरूप ; कर्जे ज्या व्याजाच्या दराने व ज्या शर्तीवर देता येतील तो दर व त्या शर्ती व तसेच कर्जे देण्याची रीत व मुदत ; आणि

(घ) ज्या हप्त्यांनी व ज्या रीतीने कर्जाची फेड केली पाहिजे ते हप्ते व ती रीत.

७. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे वगळण्यात आले [निरसन व न्यावृत्ती].

---

१ सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ३ आणि दुसऱ्या अनुसूची द्वारे हा मजकूर निरसित करण्यात आला.

२ सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (३) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

३ या कलमान्वये नियमांसाठी, शासकीय अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक ६००४-३, दिनांक १/१२/१९३०, मुंबई शासकीय राजपत्र, १९३०, मध्ये प्रकाशित झालेले भाग-एक, पृ. २९५१-५८ पहावे.

४ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

शा.मु.औ.-(एच) २९५-६,०५०-११-२००६.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद